**Shikshan Sanshodhan** : Journal of Arts, Humanities and Social Sciences
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal
Volume - 7, Issue - 04

ISSN(o): 2581-6241
Impact Factor: 6.831
April - 2024

DOIs:10.2018/SS/202404003 --:-- Research Paper / Article / Review

# महिला सक्षमीकरण आणि सामाजिक न्याय

**डॉ.सविता ज्ञानेश्वर वावगे**
**प्राध्यापक, मराठी विभाग , श्री. मुक्तानंद महाविद्यालय गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर**
Email - wawgesavita@gmail.com

**सारांश**: डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदु कोड' बील या 'ग्रंथाच्या आधारे महिलांच्या अधिकाराची व कायद्याची काय तरतूद केली आहे हे त्यांनी नमूद केले भारतीय .राज्यघटनेमधून पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना हक्क देण्याच्या व ज्या वेगवेगळ्या तरतुदी केल्या आहे ,त्यामध्ये सगळ्या संघटना,पक्ष , संस्था यामध्ये स्त्रियांना अग्रक्रम असेल .आणि आपल्या घरामधील स्त्रियांना स्थान असेल तसेच .त्यांनी आवर्जून असे सांगितले की, सभेसाठी येतांना पुरुष कार्यकर्ते यांनी आपल्या सोबत आपल्या घरच्या स्त्रियांना बरोबर घेऊन आले नाही तर पुरुषांना त्या सभेमध्ये प्रवेश मिळणार नाही. अशा प्रकारची तरतूद करणारे असे एकमेव व्यक्तिमत्व म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

**मुख्य शब्द**: खळखळ, अग्रक्रम, श्रेणीबद्ध, प्राधान्यक्रम.

"मी समजूतदार त्याला मानते ,जो सदैव जागृत व समाजनिष्ठ असतो .त्याला जिंकायला हवं ,पण त्याआधी शिकायला हवं . कारण शिक्षणामुळे मस्तक सुधारतं आणि हे सुधारलेले मस्तक कोणापुढेही झुकत होत नाही" असे विचार डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडले आहेत .डॉ .बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की ,कोणत्याही समाजाची अथवा देशाची प्रगती जर मोजायची असेल तर , ती स्त्रियांच्या प्रगतीवरून मोजली पाहिजे .म्हणजे ज्या समाजात स्त्रिया पुढे आहेत ,तो समाज पुढे आहे ,ज्या देशात स्त्रियांची प्रगती झाली ,त्या देशाची प्रगती झाली .ज्या देशात किंवा समाजात स्त्रिया मागासलेल्या असतील स्त्रिया ,शिकलेल्या नसतील किंवा जीवनातील अनेक महत्त्वाच्या पदावर नसतील ,तर तो समाज आणि देश मागे आहे .डॉ .बाबासाहेब आंबेडकरांचे २० जुलै १९४२ चे नागपूरच्या अधिवेशनामध्ये केलेल्या भाषणामध्ये त्यांनी ही बाब नमूद केली की ,२५ हजार महिला त्या अधिवेशनाला उपस्थित होत्या .त्या भाषणामध्ये ते म्हणाले की तुम्ही ,तुमच्या मुलींना शिकवा ,त्यांना महत्वकांक्षी बनवा ,त्यांचे जे न्यूनगंड आहेत ते तुम्ही त्यांना झटकायला सांगा ,सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे लग्न करण्याची घाई करू नका .कारण लग्न ही एक जोखीम आहे आणि तुम्ही हे विसरता कामा नये की ,तुम्ही तुमच्या मुलांना सर्व प्रकारच्या सुविधा व विकासाची साधने जर तुम्ही त्यांना दिल्यात तरच तुम्ही त्यांची लग्न लावून देऊ शकता .कारण लग्न केल्यानंतर जी जबाबदारी त्यांच्यावर येणार आहे ,ती जबाबदारी पेलण्याची ताकद त्यांच्या खांद्यामध्ये आणि त्यांच्या पायामध्ये असली पाहिजे .तेव्हाच त्यांची लग्न करायला हवीत .लग्न करणाऱ्या मुलांनी हे लक्षात ठेवायला हवं की जास्त मुलांना किंवा मुलींना जन्माला घालू नये ,जास्त मुलं जन्माला घालणं हा राष्ट्रीय गुन्हा आहे .लग्न केलेल्या मुलीने आपल्या नवऱ्याला अत्यंत आदराने प्रेमाने आणि नम्रपणे सांगितले पाहिजे की ,मी तुझी मैत्रीण आहे ,मी तुझ्या बरोबरीची आहे ,मी तुझी सखी आहे ,मी तुझी गुलाम नाही .डॉ .बाबासाहेब आंबेडकरांचे १९४२ चे भाषण जणू काही आजही २०२४ मध्ये लागू होत असतांना दिसते. अगदी अस वाटत की ,आजही डॉ .बाबासाहेब आंबेडकर आपल्यामध्ये उपस्थितआहे .

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदु कोड' बील या 'ग्रंथाच्या आधारे महिलांच्या अधिकाराची व कायद्याची काय तरतूद केली आहे हे त्यांनी नमूद केले भारतीय .राज्यघटनेमधून पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना हक्क देण्याच्या व ज्या वेगवेगळ्या तरतुदी केल्या आहे ,त्यामध्ये सगळ्या संघटना,पक्ष , संस्था यामध्ये स्त्रियांना अग्रक्रम असेल .आणि आपल्या घरामधील स्त्रियांना स्थान असेल तसेच .त्यांनी आवर्जून असे सांगितले की, सभेसाठी येतांना पुरुष कार्यकर्ते यांनी आपल्या सोबत आपल्या घरच्या स्त्रियांना बरोबर घेऊन आले नाही तर पुरुषांना त्या सभेमध्ये प्रवेश मिळणार नाही. अशा प्रकारची तरतूद करणारे असे एकमेव व्यक्तिमत्व म्हणजे डॉ. बाबासाहेब आबेडकर.

भारतीय समाजामध्ये चार अश्या जागा आहेत की, ज्या पक्षपाताच्या व भेदभावाच्या आहेत त्यामध्ये ,१. पुरुष सत्ताक पुरुष , वर्चस्व किंवा स्त्रियांना दुय्यम स्थान २. वर्ग– गरीब आणि श्रीमंत भेदभाव ३. जाती व्यवस्था– श्रेणीबद्ध विषमता ४. बहुसंख्यांक आणि अल्पसंख्यांक धर्म या ,चारही केंद्रांची मांडणी करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पंचसूत्री कार्यक्रमाचा आराखडा दिला . त्यामध्ये१. स्त्री पुरुष समानता. २– शिक्षण . ज्ञान प्रसार आणि प्रचार ३. संपत्तीची निर्मिती ४. आंतरजातीय विवाह ५. व्यवस्थेची चिकित्सा इत्यादी या पंचसूत्री आराखड्याद्वारे स्त्री पुरुष समानतेला सर्वात अग्रक्रम दिला आहे. तर शिक्षणामध्ये शिक्षण म्हणजे ज्ञान

संग्रह नाही तर ज्ञान प्रसार आणि प्रचार करून ज्ञान निर्मिती केली पाहिजे म्हणजेच ज्ञानात भर घातली पाहिजेसंप .त्तीच्या निर्मिती मध्ये सर्व प्रकारच्या संसाधनांचा रास्त व समान फेर वाटप केला पाहिजे. जातीची मानसिकता बदलण्यासाठी आंतरजातीय विवाह केले पाहिजे.ज्या व्यवस्थेने ही विषमता आणली त्या व्यवस्थेची चिकित्सा केली पाहिजे असे मत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे होते. अशा प्रकारच्या ह्या पंचसूत्री आणि चार केंद्रावर त्यांनी मारा केला आहे. त्यामुळे असे लक्षात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे वैश्विक विचारवंत आहेत. म्हणून फक्त भारतीय स्त्रियांपुरते हे मत मर्यादित नाही तर जगातल्या सर्व स्त्रियांना हे मार्गदर्शन पुन्हा नव्याने समजावून सांगण्याची गरज आहे.

भारतीय समाजामध्ये स्त्रियांना घटनेने दिलेल्या अधिकारामुळे त्या वेगवेगळ्या पदावर कार्यान्वित आहेत.आणि अनेक महत्वाच्या पदांवर उत्तमप्रकारे कार्य करून आपले प्रभुत्व सिद्ध करत आहे.उदा. आपल्या देशाच्या विविध पदांवर ज्यामध्ये प्रामुख्याने राष्ट्रपती, पंतप्रधान लोकसभा व राज्यसभेचे ,अध्यक्ष केंद्रीय ,अर्थ मंत्री इत्यादी पदांवर अनेक स्त्रियांनी काम केलेले आहे व करत आहे .ज्या प्रमाणे भारतीय राज्यघटनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपले मत नमूद करतात त्याच प्रमाणे महात्मा गांधी, महर्षी कर्वे, आगरकर,रानडे , महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले या सर्वांच्या विचारांमुळे त्यांना जे आत्मिक बळ मिळाल त्यामुळेच त्यांनी ती झेप जीवनाच्या सर्व क्षेत्रात घेतली तरी सुद्धा पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे शिक्षणाचे प्रमाण फार कमी दिसते आणि त्याचे मूळ कारण म्हणजे स्त्रियांच्या गळतीचे प्रमाण शाळा .सोडून बाहेर पडणाऱ्या मुलांमुलीमधून मुलींचे गळतीचे प्रमाण जास्त दिसते.परंतु बुद्धिमत्तेचा जर विचार केला तर विविध बोर्ड व विद्यापीठांच्या परीक्षेंमध्ये सर्वात जास्त गुणवत्ता मिळवणाऱ्या मध्ये मुलींचेच प्रमाण जास्त आहे. याचाच अर्थ बुद्दीमत्तेमध्ये मुली कुठेच कमी नाहीत. परंतु त्यांच्यावर जे संस्कार केले जातात समाजामध्ये असलेले जे दुय्यम स्थान ,त्यांना नगण्य समजल्या जाते त्यांची .अवहेलना होते या पार्श्वभूमीवर स्वाभिमानाने जगायला शिकून माणूस म्हणून आपले हक्क मागण ही सर्वात मोठी गोष्ट आहे. आणि हेच महत्वाचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २६ जानेवारी १९५० रोजी जी भारतीय राज्यघटना लागू केली त्या राज्यघटनेमध्ये सर्वप्रथम जे काम केले असेल ते म्हणजे स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क दिले कलम ,१४,१५ आणि १६ मध्ये ते सर्व हक्क त्यांनी नमूद केलेले आहे.

अमेरिकेत महिलांना मतदानाचा अधिकार मिळविण्यासाठी दोनशे वर्ष लढाव लागल ज्या ,इंग्रजांनी आपल्यावर दीडशे वर्ष राज्य केल त्यांना सुद्धा समान कामाला समान दाम हा हक्क इ. स. २०१५ पासून मिळायला लागला परंतु ,डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्य घटनेच्या कलम 39 नुसार या 'ड' उपकलमानुसार समान कामाला समान दाम इ.स .१९५० मध्ये मिळवून दिला. याचाच अर्थ असा आहे की, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा मागोवा घेतला तर असे लक्षात येते की, ह्या कलमानुसार स्त्रियांना अतिशय आत्मभिमानाने ,स्वाभिमानाने व नम्रपणाने वाटचाल करण्यासाठी बळ व उर्जा मिळते.

अल्पसंख्यांक समाजातील स्त्रियांना सुद्धा सर्व क्षेत्रामध्ये पुरुषांच्या बरोबरीने तिला सत्ता मिळाली पाहिजे निर्णय .प्रकियेत स्थान मिळाल पाहिजे. पद मिळाली पाहिजे आणि कुटुंबाची जबाबदारी सुद्धा पुरुषांनी आणि स्त्रियांनी दोघांनी मिळून घेतली पाहिजे . .डॉ बाबासाहेबांनी अल्पसंख्यांक महिलांच्या संबंधात लिहितांना बौद्ध महिला,जैन,मुस्लीम ,पारशी,ख्रिस्ती महिला यांच्या बाबतीत अत्यंत परखड पणे मत मांडलेले आहे .ज्यांच्या जवळ चांगले विचार आहे ,तो कधीच एकटा नसतो .आणि अशा महामानवा सोबत सर्व जग आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एका वर्गाचा विचार केला नाही तर संपूर्ण महिला वर्गाचा विचार त्यांनी मांडलेला दिसून येतो .

आधुनिक काळातील शैक्षणिक क्षेत्रात व सार्वजनिक जीवनात पाहिले पाउल टाकणारी स्त्री म्हणजे सावित्रीबाई फुले ह्या होय .आणि घटना होती १८४८ सालीमधील त्यानंतर १९२७ साली डॉ .बाबासाहेबांनी जेव्हा महाडला चवदार तळ्यात सत्याग्रह केला. तेव्हा त्यांच्या त्या आंदोलनामध्ये पुरुषांच्या बरोबरीने हजारो महिला त्यांच्या सोबत होत्या . डॉ. बाबासाहेबांनी तिथे महिलांसाठी स्वतंत्र परिषद घेतली होती. तिथे त्या महिलांना त्यांनी असे सांगितले की,तुम्ही शिक्षणाचा विचार करा ,तुमच्या मुलाबाळांना शिकवा,व्यसनी मुलबाळ ,पती असतील तर त्यांना व्यसन सोडायला लावा तुमचं जगणं जे आहे ते प्रतिष्ठेने सन्मानाने जगायला शिकले पाहिजे. आणि म्हणून डॉ .बाबासाहेबांनी त्यांना सांगितलेल्या ज्या साध्या गोष्टी होत्या त्या म्हणजे तुम्ही कपडे घालतांना सुद्धा वेगळ्या पद्धतीने घालता ,त्यामुळे लोकांना असे वाटते की ह्या खालच्या जातीच्या बायका आहे ,त्यामुळे तुम्ही अशा पद्धतीने साड्या नेसल्या पाहिजे की, ज्या सर्वसामान्य बायका नेसतात. लोखंडाचे दागिने घालू नका सोन्याचे दागिने घाला. किंवा घालू नका .आश्चर्य हे आहे की, डॉ. बाबासाहेबांच्या भाषणांचा एवढा परिणाम त्या लोकांवर झाला की तेथील हजारो स्त्रिया उठल्या शेजारच्या शेतात गेल्या आणि त्यांनी साड्या बदलल्या आणि जशा सर्वसामान्य स्त्रिया राहतात तशा त्या साड्या नेसल्या आणि डॉ .बाबासाहेबांना त्या दाखविल्या आणि विचारले की अशाच नेसायच्या ना? त्यांनी लोखंडाचे दागिने फेकून दिले, आणि हे पाहून डॉ .बाबासाहेबांना इतका आनंद झाला की ,आता आपण आपले मत त्यांना सांगितले आणि त्यांनी लगेच बदल घडवून आणला .डॉ .बाबासाहेब खुश झाले आणि त्यांनी आपल्या कार्यकर्त्यानां सांगितले की, तुमच्याकडे जेवढे सुटे पैसे असतील तेवढे घेऊन या आणि प्रत्येक महिलेला सन्मान म्हणून अभिमानाने बक्षीस म्हणून एक-एक रुपया दिला .त्या काळातील दिलेला तो रुपया त्या लोकांनी आजही जपून ठेवलेला आहे , कारणत्यांच्या मते तो दिलेला पुरस्कार हा भारतरत्न इतका महत्त्वाचा आहे.

डॉ. बाबासाहेबांनी स्त्रियांच्या संदर्भामध्ये प्राधान्यक्रम नुसताच दिला नाही तर त्यांनी अटच घातली होती की, कार्यकर्त्यांनी परीषदेमध्ये येतांना सर्वांनी घरच्या स्त्रियांना सोबत घेतल्याशिवाय यायचे नाही १२ राज्यघटनेत .व्या कलमापासून ते ५१ व्या कलमापर्यंत जेवढे हक्क पुरुषांना आहेत ते सर्व हक्क महिलांना दिलेले आहेत .डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय

राज्यघटनेमध्ये १२ व्या कलमापासून मूलभूत अधिकार दिले. आणि १३ व्या कलमांमध्ये अशी तरतूद केली की, आपल्या देशात घटनेने दिलेले जे अधिकार आहेत त्यांच्याशी सुसंगत असलेले जुने जेवढे रूढी, परंपरा,नियम, कायदे असतील ते २६ जानेवारी १९५० च्या पुढे घटनेच्या सोबत चालत राहतील. पण जुन्यातले नियम,रूढी,परंपरा,कायदे जे घटनेच्या विरोधातले आहे ,विसंगत आहे, ते सगळे काढून टाकण्यात आलेले आहे. आपल्याला असे दिसते की ही ४०० वर्षापूर्वीची परंपरा आहे परंतु ही खरे ,पाहता १००० वर्षांपूर्वीची परंपरा आहे. आणि म्हणून आम्ही स्त्रियांना हक्क देणार नाही. असे जे सांगतील जाते तेव्हा ते घटनेच्या १३ व्या कलमांच्या विरोधात आहे .डॉ .बाबासाहेबांनी भारतीय घटनेच्या १५ व्या कलमाच्या एक या उपकलमामध्ये स्त्रिया आणि मुले यांच्यासाठी विशेष तरतूद करण्यासाठी सरकारला अधिकार देऊन दिले आहेत. त्याचाच परिणाम म्हणून आपण पंचायत राज्यामध्ये स्त्रियांना महाराष्ट्रामध्ये ३३% आरक्षण दिले. आणि पुढे ते ५० % पर्यंत वाढविले. परंतु आजही विधानसभेमध्ये आणि लोकसभेमध्ये मात्र स्त्रियांना आरक्षण मिळाले पाहिजे अशा प्रकारचे बिल हे राज्यसभेत मंजूर झाले असले तरी लोकसभेत ते मंजूर झालेले नाही. याचा अर्थ अजूनही खळखळ होते आहे, अजूनही महिलांना पुरेशे अधिकार दिले जात नाही. संपूर्ण जगामध्ये स्त्रियांची लोकसंख्या ५० ,आहे % पण जगाचा अभ्यास केला तर युनायटेड नेशन ऑर्गनायझेशनने असे सांगितले की २०१२ साली ८ मार्चला इंटरपार्लेमेंटरी अहवालामध्ये ह्या ५० असलेल्या महिलांना जगामध्ये फक्त %२० % सत्तेचा वाटा मिळाला आहे. तर भारतामध्ये ११ % महिलांना सत्तेचा वाटा मिळाला आहे .भारतातील गार्गी, मैत्रीचा भारत, जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, रमाबाई आंबेडकर, रमाबाई रानडे, महर्षी कर्वे आगरकर, महात्मा फुले, गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भारत. या भारतामध्ये स्त्रियांना फक्त ११% सत्तेचा वाटा आतापर्यंत मिळाला आहे. असे आपल्याला युनायटेडच्या अहवालात दिसते आणि जगामध्ये आपल्या २२० देशांमध्ये भारताचा क्रमांक हा १०५ वा आहे. म्हणजे अजून आपल्याला बरेच मिळवायचे आहे, पण कधी कधी असे वाटते की २०२४ मध्ये जेआपण आज आहोत पुढे जायच्या ऐवजी आपण मागे तर जात नाही ?

## संदर्भग्रंथ सूची:

१. डॉ. प्रल्हाद लुलेकर (२०१५) ‘अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा दालीतेतरांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सायन प्रकाशन पुणे.
२. वा.ना.कुबेर (१९८२) ‘डॉ.आंबेडकर विचार मंथन’, लोक वाड्.मय गृह प्रकाशन मुंबई.
३. चांगदेव खैरमोडे, डॉ.आंबेडकर आणि हिंदू कोडबील, सुगावा प्रकाशन पुणे.